## प्रकरण सहावे

# अशोक व्हटकर ह्यांचे मराठी कादंबरी वाड्.मयातील स्थान

## प्रकरण सहावे

# अशोक व्हटकर ह्यांचे मराठी कादंबरी वाड्.मयातील स्थान

६.१ प्रास्ताविक

६.२ मराठी कादंबरी:प्रारंभ ते आजअखेर

६.३ अशोक व्हटकर ह्यांचे मराठी कादंबरी वाड्.मयातील स्थान

६.४ समारोप

६.५ संदर्भ व टीपा

## प्रकरण सहावे

# अशोक व्हटकर ह्यांचे मराठी कादंबरी वाङ्.मयातील स्थान

### ६.१ प्रास्ताविक :

मागील पाचव्या प्रकरणामध्ये आपण 'मेलेलं पाणी' (१९८२) व '७२ मैल' (१९८९) ह्या अशोक व्हटकरलिखित दोन कादंबऱ्यामधील वातावरणनिर्मिती व भाषाशैली ह्यांचा अभ्यास केला. आता आपण प्रस्तुत सहाव्या प्रकरणात अशोक व्हटकर ह्यांचे मराठी कादंबरी वाङ्.मयातील स्थान निश्चित करणार आहोत.

### ६.२ मराठी कादंबरीःप्रारंभ ते आजअखेर :

मराठी कादंबरीचा उगम हा 'नाटक' व 'कथा' ह्यांच्याप्रमाणेच इंग्रजीं वाङ्.मयाच्या अनुकरणातून झालेला आहे. 'कादंबरी' ह्या वाङ्.मयप्रकाराला इंग्रजीमध्ये 'Novel' हा शब्द वापरला जातो. मराठीत सुरुवातीच्या काळात 'नावल' हा शब्द वापरण्याचा प्रयत्न झाला. परंतु मराठी हा शब्द रुढ झाला नाही. त्याऐवजी बाणभट्टाने लिहिलेल्या 'कादंबरी' ह्या साहित्यकृतीवरुन कादंबरी हा शब्द रुढ झाला.

मराठी साहित्यात 'कांदबरी' हा साहित्य प्रकार महत्त्वाचा ठरला आहे. मराठी कांदबरीची वाटचाल ही 'कांदबरी' हा वाङ्.मयप्रकार समृद्ध करणारी ठरली आहे. मराठीतील पहिली स्वतंत्र व सामाजिक कादंबरी बाबा पद्मनजी ह्यांची 'यमुना पर्यटन' ही इ.स. १८५७ मध्ये प्रकाशित झाली. ह्यात प्रामुख्याने विधवांच्या दु:खाचे चित्रण आले आहे. लक्ष्मणशास्त्री हळबे ह्यांची 'मुक्तामाला' ही अद्भुतरम्य कादंबरी इ.स.१८६१ मध्ये प्रकाशित झाली. ह्यानंतर इ.स. १८७१ मध्ये रा. भि. गुंजीकरांची 'मोचनगड' ही ऐतिहासिक कांदबरी प्रकाशित झाली.

नंतरच्या काळात शिक्षणामुळे युरोपीय वाङ्.मयाचा आणि नवविचारांचा परिचय झाल्याने हरिभाऊ आपटे ह्यांनी मधली स्थिती 'मी', 'यशवंतराव खरे', 'पण लक्षात कोण घेतो?' ह्यासारख्या कांदबऱ्यामधून तत्कालीन समाजस्थितीचे, दुष्ट रुढीप्राबल्याचे, स्त्रियांच्या दास्याचे, पुरुषांच्या परधार्जिणपणाचे अत्यंत परिणामकारक चित्र रेखाटले आहे.

सामाजिक कादंबऱ्यांबरोबर ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या क्षेत्रातही हरिभाऊंनी खूप भर घातली. 'चंद्रगुप्त', 'वज्राघात', 'सूर्योदय', 'गड आला पण सिंह गेला' ह्या कादंबऱ्यामधून ऐतिहासिक सत्यकथा भास निर्माण करुन त्यांनी वाचकांना स्वातंत्र्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. ह्यानंतर वा.म. जोशी ह्यांच्या 'रागिणी', 'आश्रमहरिणी', 'इंदू काळे सरला भोळे' इ. कादंबऱ्या वाचकांसमोर आल्या. भा.वि. वरेरकरांची 'धावता धोटा', 'फाटकी वाकळ', 'कुलदैवत' इ. कादंबऱ्या डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर ह्यांची 'गोडवनातील प्रियवंदा', 'परागंदा', 'ब्राह्मणकण्या' इ. कादंबऱ्यामधून सामाजिक प्रश्नांची चर्चा झालेली आढळते.

मराठी कांदबरीतील ह्यापुढील युग म्हणजे फडके-खांडेकरांचे युग होय. ना.सी.फडके ह्यांनी रंजन करणे, हेच साहित्याचे ध्येय मानून कादंबरीलेखन केले. 'कुलाब्याची दांडी', 'जादूगर', 'दौलत', 'अटकेपार', 'समरभूमी' इ. त्यांच्या कादंबऱ्यामधून प्रणय हाच विषय आढळतो. खांडेकर हे जीवनवादी कांदबरीकार असल्यामुळे त्यांच्या कादंबरी लेखनात सामाजिक प्रश्नांना अधिक महत्त्व आहे. 'हृदयाची हाक', 'कांचनमृग', 'दोन ध्रुव', 'क्रौंचवध', 'उल्का', 'हिरवा चाफा' इ. कादंबऱ्यामधून त्यांचे समाजाबद्दलचे विशाल प्रेम आणि सहानुभूती प्रकट झाली आहे.

ग.त्र्यं. माडखोलकर ह्यांनी लिहिलेल्या 'मुक्तामा' पासून नंतरच्या त्यांच्या बहुतेक कादंबऱ्यांमधून मादक शृंगाराची वर्णने आलेली आहेत. 'भंगलेले देऊळ' व 'शाप' ह्या त्यांच्या उत्कृष्ट कादंबऱ्या आहेत. त्याचबरोबर विभावरी शिरुरकर ह्यांच्या 'हिंदोळ्यावर', 'विरलेले स्वप्न' ह्या कादंबऱ्या वास्तवतेबरोबरच मराठीत विश्लेषणाची परंपरा सुरु करणाऱ्या ठरल्या. असाच प्रयोग मर्ढेकराच्या 'रात्रीचा दिवस' ह्या कादंबरीत झाला. र.वा.दिघे ह्यांची 'पाणकळा' १९३९ मध्ये प्रकाशित झाली. ह्यामुळे प्रादेशिक जीवन मराठी कांदबरीत येऊ लागले.

स्वातंत्र्यानंतर मराठी कांदबरीलेखनाच्या प्रेरणा बदलल्या. तळागाळातील वर्ग व त्यांचे जीवन हा कांदबरीचा विषय बनू लागला. बा.भ. बोरकरांची 'भावीण', व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी', रणजित देसाई ह्यांची 'स्वामी', उद्धव ज. शेळके ह्यांची 'धग'

ह्यासारख्या कादंबऱ्यामधून भूतकाळातील व्यक्तिची आपल्याला भावलेली रुपे चित्रित करण्याचे प्रयत्न झाले.

भालचंद्र नेमाडे ह्यांनी 'कोसला' मधून जीवनाची अर्थशून्यता, भंकसपणा ह्यांची जाणीव करुन दिली. १९६० नंतर मराठी कांदबरीत अनेक परिवर्तने झालीत. ह्याच जोरावर ग्रामीण जीवनाचेआणि दलित जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन होऊ लागले. ह्या दृष्टीने 'पाचोळा', 'गोतावळा', 'फकिरा', 'माहिमची खाडी', 'हकीकत' आणि 'जटायू' ह्यासारख्या कादंबऱ्या महत्त्वपूर्ण ठरल्या. अशाप्रकारे जीवनातील अनेकविध अनुभवांचे, स्तरांचे, प्रदेशांचे दर्शन मराठी कांदबरी घडवू लागली. स्वातंत्र्यानंतरच्या मराठी कांदबरीच्या अनेक वळणांमध्ये 'दलित कादंबरी' हे वळण महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये शिक्षणापासून दूर, वंचित असलेला दलित वर्ग शिक्षण घेऊ लागला. त्यामुळे त्यातून दलित साहित्याची निर्मिती झाली. दलित साहित्यामधील महत्त्वाचे साहित्यिक अण्णा भाऊ साठे ह्यांनी 'चित्रा', 'फकिरा', 'वैजयंता', 'चंदन', 'माकडीचा माळ', 'गुलाम', 'रानबोका' इ. कादंबऱ्या लिहिल्या. शंकरराव खरात ह्यांनी 'हातभट्टी', 'मी मुक्त! मी मुक्त!', 'पारधी' इ. कादंबऱ्या लिहिल्या. ना.रा. शेंडे ह्यांनी 'शृंगारलेले प्रेत', 'काजळी रात्र' 'तांबडा दगड', 'गायत्री' ह्या कादंबऱ्या लिहिल्या बाबूराव बागुल ह्यांनी 'अघोरी' ही कांदबरी लिहिली. त्याचबरोबर 'सूड' ही कांदबरी लिहिली. भिमसेन देठे ह्यांनी 'इस्कोट' ही कांदबरी लिहिली. हरिभाऊ पगारे ह्यांनी 'युगप्रवर्तक' ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर कादंबरी लिहिली. केशव मेश्राम ह्यांनी 'हकीकत' आणि 'जटायू' लिहिली. ना.बा.जाधव ह्यांनी 'डॉ. अंजना', 'अपर्णा', 'राजाभाऊ', 'दे दान' ह्या कादंबऱ्या लिहिल्या. सुधाकर गायकवाड ह्यांनी 'शुद्र' ही लघुकादंबरी लिहिली. नामदेव ढसाळ ह्यांनी 'हाडकी हाडवळा' ही कांदबरी लिहिली. ज. वि. पवार ह्यांनी 'बलिदान' ही कांदबरी लिहिली. नामदेव व्हटकर ह्यांनी 'अपराधी', 'सोळा शिणगार' ह्या कादंबऱ्या लिहिल्या. हिं. गो. बनसोडे ह्यांनी 'मुक्तिसंग्राम', 'उज्वला', 'आभाळाएवढी' ह्या कादंबऱ्या लिहिल्या. भि.शि. शिंदे ह्यांनी 'अमृतनाक' ही कांदबरी लिहिली. वरील दलित

कादंबरीकारामध्ये कादंबरीकार अशोक व्हटकर ह्यांचे कादंबरीलेखन महत्त्वाचे आहे. त्यांच्या 'मेलेलं पाणी' आणि '७२ मैल' ह्या दोन कादंबऱ्या विशेष अशा महत्त्वाच्या आहेत.

दलित कादंबऱ्यांचा परामर्श घेत असता आपणास असे जाणवते की, दलित साहित्याने कांदबरीलेखन इतर वाड्.मयप्रकारापेक्षा कमी झालेले दिसून येते. कांदबरी हा वाड्.मयप्रकार दलित साहित्यात कमी असल्याचे कारण असे कोणत्याही सृजनशील दलित बांधवाला 'कांदबरी' ह्या काल्पनिक वाड्.मयप्रकारापेक्षा ज्यातून वास्तव, सामाजिक आशय मांडल्या जातात असे कविता व आत्मकथन हे प्रकार जवळचे वाटत असतात. म्हणून हे प्रकार कांदबरी या प्रकारापेक्षा जास्त समृद्ध असलेले दिसतात. तरीपण येणाऱ्या नजिकच्या काळामध्ये ह्या प्रकारामध्ये विपुल आणि दर्जेदार कादंबरीलेखन होईल अशी आशा बाळगायला हरकत नाही.

## ६.३ अशोक व्हटकर ह्यांचे मराठी कादंबरी वाड्.मयातील स्थान :

दलित साहित्यामध्ये 'ढोर' समाजाचे चित्रण करणारे कादंबरीकार अशोक व्हटकर ह्यांना ओळखले जाते. त्यांनी आपल्या 'मेलेलं पाणी' आणि '७२ मैल' ह्या दोन कादंबऱ्यामधून ढोर समाज आणि ढोर समाजाचे भारतीय समाजामध्ये असलेले स्थान याविषयी दृष्टीक्षेप टाकला आहे. ढोर समाजाचे चित्रण करत असता त्यांनी महार, मातंग, चर्मकार ह्या अस्पृश्य गणल्या गेलेल्या इतर जातींचा देखील 'मेलेलं पाणी' मधून परामर्श घेतला आहे. मराठी कादंबरीवाड्.मयामध्ये विशेषत: दलित साहित्यामध्ये अशोक व्हटकरांचे दलित कादंबरीकार म्हणून काही वैशिष्ट्ये ठळकपणे आपणास दिसून येतात. ती वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१. दलित साहित्यामध्ये दुर्लक्षित असणाऱ्या ढोर समाजाचे चित्रण, २. दलिताबद्दल असणारी संवेदनशीलता, ३. समर्थपणे अस्पृश्य जातींच्या समस्यांचे चित्रण, ४. कौटुंबिक वातावरणाचे चित्रण, ५. राजकारणामध्ये दलितांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण.

क्रमाने ह्यामधील एकेक वैशिष्ट्य आपण विस्ताराने जाणून घेऊ.

### १. दलित साहित्यामध्ये दुर्लक्षित असणाऱ्या ढोर समाजाचे चित्रण :

ना. म. शिंदे ह्यांच्या 'जातीला जात वैरी' ह्या कादंबरीत ढोर समाजोच चित्रण आले आहे. त्यानंतर मेलेलं पाणी मध्ये अशोक व्हटकरांनी ढोरांवर लेखन केले आहे. हिंदू धर्मामध्ये जातीयतेची उतरंड फार मोठी आहे. शिवाय आपली जात श्रेष्ठ ही भावना प्रत्येक जातीमध्ये ढोर, महार, मातंग, चर्मकार, भंगी अशी रचना व हे सोडून सर्व सवर्ण समाज अशी विभागणी झालेली आहे. सवर्ण समाज हा स्वत:ला श्रेष्ठ मानतो. अस्पृश्य समाजामध्येदेखील जातीयतेची उतरंड कशी असते ते अशोक व्हटकरांनी 'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीतून दाखवली आहे. अस्पृश्य जातीमध्ये ढोरांचे स्थान चर्मकारानंतरचे आहे. त्यानंतर महार आणि त्यानंतर मातंग समाजाचे स्थान आहे. मातंग समाज हा भंगी समाजाला शेवटचे स्थान देतो. त्याच्यापेक्षा तो स्वत:ला श्रेष्ठ मानतो. हे अशोक व्हटकरांनी चित्रित केले आहे. कातडी कमावणे हा व्यवसाय अत्यंत घाण आणि दुर्गंधी पसरविणारा आहे. हा व्यवसाय ढोर समाज करतो. 'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीचा नायक यल्लापा हा आहे. तो ढोर जातीचा आहे. कादंबरीकाराने ढोर समाजाच्या समाजिक आणि सांस्कृतिक गोष्टीचा परामर्श घेतला आहे. ढोर समाजाची वस्ती ही अत्यंत गलिच्छ असते. प्रत्येक ढोरांच्या घरासमोर कातडी कमावण्यासाठी उबारने असतात. त्यामुळे त्यांचा वास साऱ्या ढोरवाड्यात पसरत असतो. ढोरांना त्याची सवय झाल्याने त्या घाणीचा वास त्यांना येत नाही. ढोरांची सांस्कृतिक ओळख सांगताना ढोर समाज हा स्वत:ला वीरशैव कक्कैया ह्या लिंगायत समाजाशी आपली नाळ जोडताना दिसतो. १४ व्या १५ व्या शतकात लिंगायत धर्माची दीक्षा देणारा कक्कैया हा त्यांचा मूळचा गुरु. त्यांच्या नावावरुन ही जमात स्वत:ला कक्कैया समजून घेते. म्हणून ते शिवलिंगाची पूजा करतात. ढोर समाजाचे हे चित्रण वैशिष्ट्यरित्या अशोक व्हटकरांनी चित्रित केले आहे.

### २. दलिताबद्दल असणारी संवेदनशीलता :

'मेलेलं पाणी' आणि '७२ मैल' मधून कादंबरीकार अशोक व्हटकर ह्यांनी दलितांबद्दल अपार कोटीची सहानुभूती दाखवली आहे. मेलेलं पाणी ही संपूर्ण कादंबरी ढोर समाजाच्या भोवती फिरत रहाते. ढोर, महार, मातंग, चर्मकार समाजाच्या सामजिक,

शैक्षणिक अडचणी मेलेलं पणी मधून त्यांनी चित्रित केल्या आहेत. '७२ मैल' ह्या कादंबरीत 'राधाक्का' नावाच्या स्त्री व्यक्तिरेखेतून स्त्रीच्या व्यथा, वेदना ह्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. सबंध अस्पृश्य वर्गाबद्दल तसेच स्त्री जातीबद्दल असलेला पारंपरिक, विषमतावादी दृष्टीकोन स्वत:ला पुरोगामी समजणाऱ्या भारतीय लोकांनी बदलला पाहिजे हे कादंबरीकाराने सांगण्याचा प्रयत्न 'मेलेलं पाणी' आणि '७२ मैल' मधून केलेला आहे. कादंबरी दलितांविषयी बोलताना '७२ मैल' ह्या कादंबरीमध्ये 'प्रास्ताविक' मध्ये म्हणतो, ''मी काही तत्वचिंतक नाही, की दु:खावर मी तोडगा सांगू शकेन. पण वाटते, आता हा जातीयवाद पुरे झाला, फार झाला. यातून नक्कीच देशाचे भले होणार नाही. ढीगभर एकतेच्या जाहिराती करा.. पण देशात जातीयवादाचे भयानक पीक वेगवेगळ्या आकाररुपाने, रंगाने बदलत आहेच. जर या देशाला शांतता, स्थैर्य, ऐक्य पाहिजे असेल तर त्यांनी कोणत्याही प्रकारची नाटके, फसवेगिरी, डावपेचं न खेळता दलितांना दिलेले दुय्यम-तिय्यम नागरिकत्व काढून समान दर्जा तर दिलाच पाहिजे. जे ५,००० वर्षे भयाण, अत्याचार, दारिद्रय, उपासमार भोगत आहेत, त्यांच्या तोंडून ४० वर्षे पुरी व्हायच्या आतंच भाकरी काढून घेता? मीही एक संस्कृत तज्ञ आहे. मी पूर्वकालापासून इतिहास जाणतो. जर गुजरात, बिहार आणि महाराष्ट्रासारख्या प्रांतात दलिताविरोधी चळवळ उभी राहिली तर त्यांचा एकच परिणाम निघेल. यादवी ! आम्ही मरु! पण या देशाला कायमचे बदनाम करुनच मरु. आम्हाला आमचे हक्क दिलेच पाहिजेत आणि ते आम्ही मिळवल्याशिवाय राहणार नाहीच.''[१] अशाप्रकारची दलिताबद्दल असणारी संवेदना कादंबरीकार अशोक व्हटकरांनी दाखवली आहे.

### ३. समर्थपणे अस्पृश्य/ दलित समाजाच्या समस्यांचे चित्रण :

कादंबरीकार अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबरीलेखनाचा मुख्य हेतू दलित समाजाच्या समस्यांचे चित्रण करणे हा आहे. 'मेलेलं पाणी' मधून पोटाची आग विझवणे ह्या एकमेव कारणासाठी त्यामधील व्यक्तिरेखा धडपडताना दिसतात. कादंबरीचा नायक यल्लापा असो अगर कादंबरीमधील गौण व्यक्तिरेखा हारळ्या महार, साधू मांग, येसबा चांभार असो ही सर्व मंडळी पोटापाण्याचा प्रश्न मिटवण्यासाठी धडपडताना दिसतात. आपली जात ही सर्व जातीमध्ये खालच्या दर्जाची आहे हे माहित असताना ते ह्याबद्दल कुठे तक्रार करताना दिसत

नाहीत. मागल्या जन्माचे पाप म्हणून आपल्याला ढोर म्हाराचा जन्म मिळाला आहे, असे ते समजतात. ह्या खालच्या जातीमध्येदेखील जातीमधील उच्चनिचता पाळली जाते. ह्या समस्येवर कादंबरीकार अचूकपणे बोट ठेवतो. ढोरांना कातडी कमावण्याचा, चांभारांना चपला तयार करण्याचा. मांगांना दोरखंड वळण्याचा असा पारंपरिक धंदा आहे. परंतु महारांना असा कोणताच धंदा नाही. मिळेल ते काम करुन मिळेल ते खाणे हेच त्यांचे काम आहे. हे कादंबरीकाराने 'मेलेलं पाणी' मधून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

अंधश्रद्धा, रुढी, परंपरा ह्या प्रत्येक समाजात कटाक्षाने पाळल्या जातात. हे सांगाताना त्यांनी कादंबरीतील व्यक्तिरेखा ह्या डॉक्टराकडे आजारी माणसाला घेऊन जात नसल्याचे दाखविले आहे. 'मेलेलं पाणी' मधील हारळ्या महाराची बहीण आणि रामकिसनची बायको आकनी आपल्या पोरांना देवरुशांकडून अंगारा धुपारा करत असल्याचे दिसते. '७२ मैल' मधील राधाक्का ही आपल्या पोरांना अंगारा ववाळून टाकणाऱ्या देवरुशांकडेच जाताना दिसते. ह्यावर उपाय म्हणून शिक्षण घेतले पाहिजे हे सांगण्यासाठी लोकसेवेचे व्रत घेतलेले गुरुजींची व्यक्तिरेखा 'मेलेलं पाणी' मध्ये आलेली आहे. महार, मांग, ढोर, चर्मकार ह्यांनी गलिच्छ कामे करणे, गलिच्छ राहणे सोडून द्यावे ह्यासाठी गुरुजी प्रयत्न करताना दिसतात. '७२ मैल' ह्या कादंबरीत राधाक्का आपल्या पोरांच्या पोटाचा विषय मिटवण्यासाठी एका हॉटेलमधील नोकराला आपले शील चारित्र्य विकते. भूकेने व्याकूळ झालेल्या पोरांना मूठभर शेवेसाठी तिला आपली इज्जत विकावी लागते. ह्यावरुन कादंबरीकारांनी आपली मान, मर्यादा, प्रतिष्ठा ह्यापेक्षा पोटाची आग महत्त्वाची असते. हे दलित स्त्रीचे उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे.

अस्पृश्य जातीमध्ये एखाद्या सामाजिक समस्येसाठी ह्या पोटजाती एकमेकाला मदत करताना दिसत नाहीत. उलट ह्या जाती एकमेकांचे पाय ओढताना दिसतात. ह्याचे चित्रण 'मेलेलं पाणी' मध्ये करुन सामाजिक समस्येवरती कादंबरीकाराने प्रकाश टाकला आहे. गावामधील बाळगोंड पाटील हा यल्लापा ढोराला काठीने मरेपर्यंत मारतो हे चांभारांना समजल्यानंतर चांभार लोकच यल्लापाला नावे ठेवतात. ते म्हणतात, ''न्हाय तरी यल्लापालाच लय गुर्मी...पायरी वळकून ऱ्हावावं हे काय न्हायी. बरं झालं. दुसऱ्या वक्ती पुन्ना त्यो ततं

जाणार नाही. इतकेच नव्हे तर बरेचसे ढोरही काही करमणुकीचा कार्यक्रम तेथे होणार असल्याप्रमाणे जमले होते. एक ढोर कामगार आपल्या मित्राला म्हणतो, "भडव्याला पयशाची लय घमंड हुती. आता हुकीऱ्या फवजदाराच्या तडाख्यात गावला की कस वकतोय बग....आसंच पायजे!"[२] ह्या प्रकारचे संवाद कादंबरीकाराने लिहून अस्पृश्य जातीमधील दुरावा कशाप्रकारचा असतो, हे सांगितले आहे. ह्या सामाजिक समस्यांचे चित्रण करण्यात कादंबरीकार कमालीचा यशस्वी झाला आहे. असे म्हणता येते.

**४. राजकारणामध्ये दलितांवर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण :**

'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीमध्ये गावातील सवर्ण लोक खालच्या ढोर असलेल्या समाजाला हातच्या बाहुल्याप्रमाणे खेळवतात. मुळातच ढोर समाज हा अल्पसंख्य असल्याने ते राजकीय दृष्टिकोनातून त्याला त्रास देण्याचा प्रयत्न करतात. ढोर समाजाने आपल्याच पार्टीला मतदान केले पाहिजे ह्यासाठी गावचा प्रत्येक पार्टीचा पुढारी ढोर समाजाला धमकावण्याचा प्रयत्न करतो. गावच्या ग्रामपंचायतीच्या राजकारणामध्ये सरपंच असलेला दादाजीराव नाईक ढोर समाजाला धमक्या देतो. तो म्हणतो, "धेनात राकून ऱ्हावा....तुमास्नी गावात ऱ्हायच हाय....मी पडलो तरी डरनार न्हाय...पर तुमाला न्हाय देसूधडीला लावलं तर बाचं नाव सांगणार न्हाय...धरणाच्या वड्यावरच्या तुमच्या चुनाडी पार इस्कटून टाकीन...दादाजीराव म्हंत्यात मला. मतं द्याचं असलं तर मलाच पाहिजे... न्हाय तर कुत्र्यावानी घरात पडून ऱ्हावा."[३] त्याचबरोबर गावातील इतर पार्टीचे हणमंतराव देसाई, बाळगोंड पाटील हे सुद्धा धमकी देतात. ढोरांच्या स्वतःच्या मताला येथे किंमत नाही. त्यांना राजकारणात अशाप्रकारे वापरले जाते. हे कादंबरीकाराने योग्य व अचूक निरीक्षणाने येथे चित्रित केले आहे. ढोरांची जशी राजकीय बाबतीत स्थिती असते तशीच इतर महार, मातंग, चर्मकारांची असते. ढोर समाजाची ह्या ग्रामपंचायतीच्या इलेक्शनाबाबतीत चर्चा होते आणि कोणालाच मतदान करायचे नाही असा निर्णय घेतला जातो. आपल्याला ढोरांचे मतदान झाले नाही म्हणून सरपंच दादासाहेब नाईक -पाटील हा कलेक्टरामार्फत ढोरांच्या चुनाड्या बंद करण्यासाठी नोटीस काढतो. राजकीय वैमनस्यातून बदला घेण्याची त्यांची जी मनोवृत्ती असते त्याचा परामर्श कादंबरीकारांने घेतला आहे. दादासाहेबांसारखाच बाळगोंड पाटील

हासुद्धा ढोरांना मदत करत नाही. आपल्या पार्टीच्या उमेदवाराला ढोरांनी मतदान केले नाही म्हणून पाणी मागायला गेलेल्या यल्लापाला आपली विहीर बाटणार म्हणून पाणी देत नाही. राजकारणाचा द्वेष काढून तो यल्लापाला मरेपर्यंत मारतो. ढोरांची स्थिती गावच्या राजकारणात अत्यंत वाईट होते. न्याय कोणाकडे मागावा हा प्रश्न त्यांच्यासमोर पडतो. प्रत्येक गोष्टीत त्यांची अवहेलना होते. आई जेऊ घालेना आणि बाप भीक मागू देईना, अशी परिस्थिती त्यांची होऊन बसते. गावच्या राजकारणामध्ये हा ढोर समाज कशाप्रकारे हतबल झाला आहे ह्याचे चित्रण कादंबरीकाराने समर्पकरित्या केले आहे. कादंबरीकार आपल्या '७२ मैल' ह्या कादंबरीच्या प्रास्ताविकामध्ये म्हणतो, ''संपूर्णपणे उपेक्षित ढोर समाज कातडी कमावण्याचा व्यवसाय करणार आणि त्यावर खेड्यापाड्यात होणारे आजच्या जातीवाद, राजकारण, अज्ञान इ. अनेकांचे परिणाम होत जाऊन तो लोकशाहीत कसा हतबल झाला आहे, वाचा गेल्यासारखा झाला आहे हे त्या कादंबरीत दाखवले होते.''[४] एवढ्यावरुन कादंबरीकाराची ढोर समाजाच्या बाबतीत सामाजिक भावनेची कल्पना यायला हरकत नाही. राजकारण, जातियवाद इ. प्रश्नाचे डोळे उघडून समस्याचित्रण करण्याचे काम त्याने खंबीरपणे पार पाडले आहे असे म्हणावे लागेल. रविंद्र ठाकूर ह्यांनीही आपल्या मराठी ग्रामीण कादंबरी ह्या पुस्तकात अशोक व्हटकरांचा उल्लेख केला आहे. ते लिहितात की, ''मेलेलं पाणी' मधून ढोर समाजाचे जीवन शब्दरुप करणाऱ्या ह्या लेखकाने 'बगाड' ही कादंबरी लिहिली. ग्रामजीवनाचे एक वेगळे रुप वाचकासमोर ठेवले आहे. ह्या वाक्प्रचावरुन हे दिसून येते की, अशोक व्हटकर हे 'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीमुळेच नावारुपाला आलेले दिसतात.'[५]

## ६.४ समारोप :

अशाप्रकारे अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबरीलेखनाची वैशिष्टये 'मेलेलं पाणी' (१९८२) व '७२ मैल' (१९८९) ह्या दोन कादंबऱ्यांच्या अभ्यासातून आपल्या हाती येतात. त्यांच्या सामर्थ्याचा दलित कादंबरीकार म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचा व त्याचबरोबर त्यांच्या मर्यादांचा विचार करता असे लक्षात येते की, दलित कादंबरी क्षेत्रातील त्यांचे कार्य महत्त्वाचे व उल्लेखनीय आहे. दलित कादंबरीचा आणि एकूणच मराठी

कादंबरीचा प्रवाह समृद्ध आणि संपन्न करण्यात ज्या ज्या १९६० नंतरच्या कादंबरीकारांनी योगदान दिले त्यांच्यामध्ये अशोक व्हटकरांचे स्थान फार मोलाचे असे आहे.

## ६.५ संदर्भ व टीपा :

१. व्हटकर अशोक, '७२ मैल' , पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८९, पृ.८.

२. व्हटकर अशोक, ''मेलेलं पाणी' , पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८२, पृ.७४.

३. तत्रैव, पृ. ३३.

४. व्हटकर अशोक, '७२ मैल' , उपरोक्त, पृ.५.

५. डॉ. रवींद्र ठाकूर, 'मराठी ग्रामीण कादंबरी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे द्वितीयावृत्ती : १ सप्टेंबर २००१, पृ.१७१.